गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले ● अंक १५ वा ● गुरुवार ०१ जून २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 15 | Date : 01/06/2023 | blow :Thursday | Page 4 | Price 4

## एलपीजी गॅसच्या दरांत मोठी घट

### व्यावसायिक सिलेंडर ८३.५ रुपयांनी स्वस्त

नवी दिल्ली : एलपीजी गॅसच्या किमतींत मोठी घट झाली आहे. एलपीजी विकणाऱ्या कंपन्यांनी दर स्वस्त केले आहेत. व्यावसायिक एलपीजी गॅसच्या



किमतीतही कपात झाली आहे. घरगुती एलपीजी सिलिंडरचे दर पूर्वीप्रमाणेच आहेत. यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. यापूर्वी १ मे २०२३ रोजी व्यावसायिक गॅसच्या किमतींत १७२ रुपयांनी कपात करण्यात आली होती. दरम्यान, आता १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी गॅस सिलेंडरसाठी १७७३ रुपये मोजावे लागणार आहेत. पूर्वी हाच सिलेंडर १८५६.५० रुपयांना मिळत होता. नवी दिल्लीत व्यावसायिक गॅसची किंमत ८३.५ रुपयांनी कमी झाली असून ती आता १७७३ रुपयांवर पोहोचली आहे. त्याचबरोबर घरगुती गॅस सिलेंडरचा दर ११०३ रुपयांवर कायम आहे. गेल्या महिन्यात व्यावसायिक गॅसचा दर १८५६.५० रुपये प्रति सिलेंडर होता.

त्याचबरोबर घरगुती गॅस सिलेंडरचा दर ११०३ रुपयांवर कायम आहे. १ जूनपासून, बदललेल्या व्यावसायिक गॅस सिलेंडर दिल्लीमध्ये १७७३ रुपयांना विकला जात आहे. आणि १ जून रोजी कोलकातामध्ये १८७५.५० रुपयांना मिळत आहे.

मुंबईत १९ किलो व्यावसायिक । पान २ वर

## अहमदनगर जिल्ह्याला अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देणार : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

अहमदनगर : पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी उत्तम राज्य कारभाराचा आदर्श घालून दिला आहे. त्यांनी भारताला प्रशासकीय संरचनेची मोठी देणगी दिली आहे. अहमदनगर जिल्ह्याला अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केली. त्यांच्या नावामुळे जिल्ह्याचा मान मोठा होणार असल्याचेही ते म्हणाले. चौंडी, ता.जामखेड येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या २९८ व्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते.व्यासपीठावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार सदाशिवराव लोखंडे, खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आमदार प्रा.राम शिंदे, आमदार मोनिका राजळे, आमदार बबनराव पाचपुते, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार सुरेश धस, माजी खासदार विकास महात्मे, माजी आमदार भीमराव धोंडे, अण्णासाहेब डांगे, बाळासाहेब मुरकुटे, लक्ष्मणराव ढोबळे, पोपटराव गावडे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पुनित झालेले आपले राज्य असून या भूमीचा वसा आणि वारसा वाहणाऱ्यांची मोठी मांदियाळी आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे काम आणि कर्तृत्व खूप मोठे होते. सर्वसामान्यांसाठी त्यांनी केलेला त्याग सर्वश्रुत आहे. त्या काळात जमीन महसूल, शेतसारा, चलन व्यवस्था, डाकसेवा यासारख्या व्यवस्था त्यांनी उभारल्या. शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांच्या हितासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. त्यांनी जन्म घेतलेल्या या मातीचे आपल्यावर खूप मोठे ऋण असल्याचेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले. सर्वसामान्यांना न्याय देणारे हे सरकार असल्याचे सांगत मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, सर्वसामान्यांच्या हितासाठी शासनाने विविध निर्णय घेतले आहेत. केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्य शासनाने नमो शेतकरी सन्मान योजना सुरू केली असून केंद्र सरकारचे सहा हजार व राज्य शासनाचे सहा हजार असे १२ हजार रुपये शेतकऱ्यांना मिळणार आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सहकारी तत्वावरील महामंडळासाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.



उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची ज्योत पेटवली. आपला आत्मभिमान, आत्मविश्वास व आत्मसन्मान जागृत करून हिंदवी स्वराज वाढवले. पुण्यश्लोक अहिल्यादेवीनी आपल्या कार्याच्या माध्यमातून हिंदवी स्वराज्याचा विस्तार संपूर्ण देशभर केला. न्यायप्रिय शासन व्यवस्था उभारून सर्वसामान्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडवण्याचे काम केले. अहिल्यादेवी होळकर यांचे राज्य परिवर्तनवादी व पुरोगामी होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी त्या काळात न्यायप्रिय शासन व्यवस्था निर्माण केली.त्यांनी राज्यात पायाभूत सुविधा निर्माण करण्याबरोबरच हुंडाबंदी, मद्यबंदी बाबत जागृतीचे काम केले. देशभरातील । पान २ वर

## देशातील हिंदू मंदिरांमध्ये स्वच्छता नसते, नितीन गडकरींचं मोठं वक्तव्य



मुंबई : केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी बुधवारी देशातील हिंदू मंदिरांबाबत मोठं आणि महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. हिंदू मंदिरांमध्ये स्वच्छतेचं पालन केलं जात नाही, असं वक्तव्य नितीन गडकरी यांनी केलं आहे. एका कार्यक्रमात बोलताना नितीन गडकरींनी हे वक्तव्य केलं आहे. नितीन गडकरी एका कार्यक्रमात बोलताना म्हणाले की, देशातील हिंदू मंदिरांमध्ये स्वच्छता नसते. एका कार्यक्रमात बोलताना ते म्हणाले, मला वाटतंय आपला देश असा आहे की, जिथे हिंदू समाजाच्या मंदिरांमध्ये स्वच्छता नाही. तिथे धर्मशाळा चांगल्या नाहीत. परदेशात गेल्यावर तेथील गुरुद्वारा, मशीद, चर्च यांचं वातावरण पाहून मला वाटलं की, आपली प्रार्थनास्थळं चांगली असावीत. मला जेव्हा याबाबात काहीतरी करण्याची संधी मिळाली त्यावेळी मी, महाराष्ट्रात १२ हजार कोटी रुपयांचा पालखी मार्ग बांधला. मीडिया रिपोर्ट्सनुसार, गडकरी यांनी सांगितलं की, उत्तराखंडमधील पिथौरागढ येथून निघणाऱ्या कैलास मानसरोवरच्या मार्गाचे ८० ते ८५ टक्के काम पूर्ण झालं आहे. पूर्वी नेपाळमधून जावं लागायचं । पान २ वर

## स्वित्झर्लंड भारताशी मुक्त व्यापार करण्यास उत्सुक, विद्यापीठे व उद्योगांसाठी 'इनोव्हेशन प्लॅटफॉर्म' तयार करणार : राजदूत डॉ. राल्फ हेकनर

मुंबई : भारतात किमान ३३० स्विस कंपन्या कार्यरत आहेत. त्यापैकी १५० एकट्या महाराष्ट्रात आहेत. त्यामुळे महाराष्ट्र हे स्वित्झर्लंडसाठी सर्वात महत्त्वाचे राज्य असून भारताशी मुक्त व्यापार करार करुन हे व्यापारी संबंध अधिक दृढ करण्यासाठी स्वित्झर्लंड प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन स्वित्झर्लंडचे भारतातील राजदूत डॉ. राल्फ हेकनर यांनी केले आहे. डॉ. राल्फ हेकनर यांनी मंगळवारी (दि. ३०) राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन येथे सदिच्छा भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते.




पुणे येथे नुकतीच आपण सार्वजनिक व खासगी विद्यापीठांच्या प्रमुखांशी भेट घेतली. विद्यापीठांमध्ये होत असलेल्या संशोधनाचा व्यापाराला लाभ व्हावा, याकरिता स्वित्झर्लंडच्या पुढाकाराने उद्योग व विद्यापीठांसाठी एक सामायिक 'नाविन्यता व्यासपीठ' ('इनोव्हेशन प्लॅटफॉर्म') सुरु करण्याबाबत विचार सुरु असल्याचे राजदूतांनी सांगितले.

या व्यासपीठावर आयआयटी सारख्या संस्थांनादेखील घेतले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. हा प्रयोग यशस्वी झाला तर तो २२ देशांमध्ये राबविला जाईल, असेही ते म्हणाले.स्वित्झर्लंडमधील जिनेव्हा येथे संयुक्त राष्ट्र संघाची व्यापार, आरोग्य विषयक कार्यालये आहेत. तसेच दावोस येथे दरवर्षी जागतिक आर्थिक परिषद होते. या दोन्ही ठिकाणी भारताचा सहभाग लक्षणीय आहे. त्यामुळे भारताच्या मताची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावर घेतली जाते, असे त्यांनी सांगितले.भारताच्या स्वातंत्र्याला १०० वर्षे पूर्ण होतील, तोवर भारताला विकसित राष्ट्र करण्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे स्वप्न असल्याचे नमूद करून या उद्दिष्ट प्राप्तीसाठी भारत – स्वित्झर्लंड मुक्त व्यापार करार होणे आवश्यक असल्याचे हेकनर यांनी सांगितले.

स्वित्झर्लंड – भारत मुक्त व्यापार करार झाल्यास । पान २ वर

## दुर्गराज रायगडवर ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याची जय्यत तयारी सुरू, शिवभक्त रायगडवर जमण्यास सुरुवात

रायगड : दुर्गराज रायगडवर छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याची जोरदार तयारी सुरू आहे. येत्या २ जून रोजी तिथीप्रमाणे तर ६ जून रोजी तारखेप्रमाणे शिवराज्याभिषेक सोहळा होणार आहे. तिथीप्रमाणे शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या कार्यक्रमाची सुरुवात झाली असून आज गणेश पूजनाचा कार्यक्रम घेण्यात आला.



राज दरबारमध्ये ३५० वर्षांपूर्वी शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा संपन्न झाला. त्यावेळी असलेल्या दरबाराचं चित्र उभं करण्याचा प्रयत्न केला जातोय. शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी हजारो शिवभक्त सध्या रायगडावर दाखल झालेत. यंदा शिवरायांच्या राज्याभिषेक सोहळ्यासाठी चांदीची पालखी वापरली जाणार आहे. दरम्यान आज या पालखीचं पूजन करण्यात आलंय.

तिथीप्रमाणे होणाऱ्या रायगडवरील शिवराज्याभिषेक सोहळ्याचं आयोजन असं असेल,

१ जून– गडदेवता शिर्काई पूजन, छत्रपती शंभू महाराज जयंती उत्सव, गंगासागर पूजन, संध्याकाळी पारंपरिक गोंधळ, रात्री सांस्कृतिक कार्यक्रम

२ जून –

सकाळी ७ वाजता ध्वजारोहन सोहळा । पान २ वर

## तंबाखूजन्य पदार्थांसाठी ओटीटी माध्यमांना नवी नियमावली, केंद्रीय आरोग्य विभागाकडून नवे नियम जाहीर

नवी दिल्ली : जागतिक तंबाखू विरोधी दिनाचे औचित्य साधून केंद्रीय आरोग्य विभागाकडून नवे नियम जाहीर करण्यात आलेले आहेत. ही नवी नियमावली ओटीटी माध्यमांसाठी जाहीर करण्यात आली आहे. या नियमांनुसार, आता ओटीटी माध्यमांना तंबाखू विरोधी चेतावणी देणे अनिवार्य असणार आहे. तसेच जर ओटीटी माध्यमांवरील कार्यक्रमांमध्ये नव्या नियमांचे पालन करण्यात आले नाही तर, केंद्रीय आरोग्य विभाग आणि माहिती व प्रसारण विभागाकडून संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात येणार आहे.



आरोग्य विभागाकडून या सूचना जागतिक तंबाखू विरोधी दिनादिवशी जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे यानंतर नेटफ्लिक्स, ॲमेझॉन प्राइम, हॉटस्टार आमि सोनी लिव्ह यांसारख्या ओटीटी माध्यमांवरील कार्यक्रमांसाठी तंबाखू विरोधात चेतावणी देणे अनिवार्य असणार आहे. चित्रपटगृहांमध्ये आणि टिव्हीवर दाखवण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये या सूचना दाखवणे आधीच अनिवार्य करण्यात आलेले आहे. ज्यामध्ये चित्रपट आणि कार्यक्रमांच्या सुरुवातील आणि मध्ये कमीत कमी तीस सेकंद तंबाखूविरोधात चेतावणीची जाहिरात दाखवणे अनिवार्य करण्यात आलेले आहे.

नव्या नियमांनुसार, तंबाखू । पान २ वर

## दोन हजाराची नोट घेण्यास नकार दूध विक्रेता आणि ग्राहक यांच्यात शाब्दिक वाद

अक्कलकोट/प्रतिनिधीः दोन हजाराची नोट बदलून घेण्यासाठी बँकेत ग्राहकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ दिसून येत आहे. तर दुसरीकडे शहरातील एका नामांकित दुग्ध व्यवसायिकाच्या दूध डेअरीत दोन हजाराची नोट घेण्यास नकार देण्यात आल्याने दूध विक्रेता आणि ग्राहक यांच्यात बराच वेळ शाब्दिक वाद सुरू असल्याचा प्रकार दिसून आला. उपस्थित नागरिकांमधून मात्र संबंधित दूध डेअरीच्या मनमानी कारभारावर संतप्त प्रतिक्रिया उमटत होत्या.रिझर्व बँकेने दोन हजाराची नोट चलनातून बंद करण्याचा निर्णय नुकताच घेतला. मात्र व्यवहारात नोट चालणार असल्याचे देखील जाहीर केले. २३ मे ते २३ सप्टेंबर २०२३ पर्यंत दोन हजाराची नोट दैनंदिन व्यवहारात आणि बँकेच्या व्यवहारात देखील वापरता येणार आहे. दोन हजाराची नोट बदलून घेण्यासाठी चार महिन्यांची मुदत देखील रिझर्व बँकेने दिली आहे. दोन दिवस झाले नाही तोच त्या दूध विक्रेत्या व्यावसायिकाने ग्राहकांकडून दोन हजाराची नोट घेण्यास स्पष्ट शब्दात नकार दिल्याने उपस्थित इतर दूध ग्राहकांतून तीव्र संताप व्यक्त केला गेला. मात्र तरी देखील त्या दुग्ध व्यावसायकाने दोन हजाराची नोट घेण्यास नकार देत आम्ही ती दोन हजाराची नोट घेणार नाही, आमच्या इतर शाखेत देखील घेण्यास मनाई करण्यात आल्याचे सांगत उर्मट आणि मग्रुरीची भाषा वापरण्यात आली. रिझर्व बँकेने कोणीही व्यवहारात दोन हजाराची नोट नाकारू नये असे स्पष्ट सांगितलेले असताना, त्या दूध विक्रेत्याचे नोट नाकारण्याचे एवढे धाडस झालेच कसे? एखाद्या वेळेस सुटे पैसे नसतील तर समजून घेता येऊ शकते. किमान तसे कारण असते तर दूध ग्राहकाने मान्य केले असते. मात्र दैनंदिन व्यवहारात हजारोंची उलाढाल होत असताना नोट नाकारणे म्हणजे अर्थव्यवस्थेची खिल्ली उडविल्याचे उपस्थितांमधून भावना व्यक्त होत होत्या. या संदर्भात ग्राहक मंच अथवा जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार करणार असल्याचे एका सामाजिक संघटनेने बोलताना सांगितले. मात्र तरीही त्या दूध विक्रेत्यावर कोणताही फरक पडला नाही. कोणाकडेही जाऊन तक्रार करा, आमचे कोणीही काही वाकडे करू शकत नाही. अशा पद्धतीची अरेरावीची भाषा त्या दूध विक्रेत्याने संबंधित उपस्थितांसमोर दूध ग्राहकासोबत वापरली. त्यामुळे यापुढे मुदतीत दोन हजाराची नोट नाकारणाऱ्या संबंधितांना शासकीय यंत्रणेकडून कान उघडणी करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने अक्कलकोटच्या प्रशासकीय यंत्रणेने देखील दक्षता घेतली पाहिजे. एखाद्या व्यवसायिकाने दैनंदिन व्यवहारात दोन हजाराची नोट नाकारताच त्या तक्रारदाराची तक्रार घेऊन संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

## व्यसनापासून दूर राहा व आरोग्य सांभाळा : कोहिणकर



सोलापूर/प्रतिनिधीः भारतात इतर देशांच्या मानाने तंबाखूमुळे मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्या दरवर्षी वाढत आहे. तंबाखूच्या सेवनाचे अनेक दुष्परिणाम असून, तंबाखू सेवन अनेक रोगांना निमंत्रण देते. त्यामुळे तंबाखूच्या व्यसनापासून दूर राहून आरोग्य सांभाळावे, असे आवाहन अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी आज येथे केले

राष्ट्रीय आरोग्य अभियान, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम व मानसिक आरोग्य कार्यक्रम तसेच जिल्हा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त आयोजित दंत व मानसिक आरोग्य तपासणी शिबिरात ते बोलत होते. जिल्हा परिषद प्रांगणात आयोजित या कार्यक्रमास जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनंजय पाटील, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमीतकर, । पान २ वर

## ✻ सुविचार ✻

शिक्षण म्हणजे मानवाच्या अंगी जे सुप्त पूर्णत्व आहे, त्याचेच प्रकटीकरण होय.- स्वामी विवेकानंद

## संपादकीय

### पुन्हा बैलगाडा शैर्यत..

बैलगाडा शर्यत बंदीमुळे ग्रामीण अर्थकारणाला मोठा फटका बसला होता. गावांतील ग्रामदेवतांच्या यात्रेमध्ये धार्मिक व संस्कृती परंपरा म्हणून बैलगाडा शर्यती आयोजित केल्या जातात. त्यातून ग्रामीण अर्थव्यवस्थेत मोठी आर्थिक उलाढाल होते. शर्यत बंदीमुळे बैलांच्या संख्येत व किमतीत होणारी घट तसेच शर्यतीचे साहित्य तयार करणारे ग्रामीण कारागीर, शर्यतीला उपयोगी साहित्य तसेच वाहतूक व्यवस्थेसहित सर्वांचेच शर्यत बंदीमुळे कंबरडे मोडले होते. ग्रामीण कारागीर बेरोजगार झाले होते. राज्यात जवळपास ६५ हजार नोंदणीकृत बैलगाडा मालक आहेत. प्रत्येकाकडे किमान चार बैल गृहीत धरल्यास जवळपास अडीच ते तीन लाख शर्यतीच्या बैलांच्या संगोपनावर प्रत्यक्ष परिणाम झालेला आहे. बैलगाडा शर्यतीच्या माध्यमातून देशी गाय - बैलांच्या संगोपनास प्रेरणा मिळते व त्यातूनच उपयुक्त देशी गोवंशची वाढ होते. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा सर्वच प्रकारे सकारात्मक परिणाम दिसून येणार हे निश्चित. एक महत्त्वाचा बैलगाडा शर्यत या महाराष्ट्राच्या पारंपरिक खेळाचे सर्वांनाच मोठे आकर्षण आहे. याच बैलगाडा शर्यतीवर काही वर्षांपूर्वी बंदी लादली गेली होती व त्याचा फार मोठा विपरित असा दूरगामी परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होत होता. बैलगाडा शर्यतीवरील बंदी आणि सततचा दुष्काळ यामुळे राज्यातील देशी जनावरांमधील सर्वात सुंदर व रुबाबदार म्हणून ओळखली जाणारी दुभत्या जनावरांतील खिल्लार ही जात काही दिवसांत नामशेष होईल की काय अशी स्थिती निर्माण झाली आहे. गेल्या वीस ते पंचवीस वर्षांपूर्वी ग्रामीण भागातील प्रत्येक शेतकऱ्याच्या दारापुढे खिल्लार गाई असायच्या. त्याला कारणही तसेच होते. खिल्लार या गाईच्या दुधापासून एक प्रकारची ऊर्जा मिळायची. बैलगाडा शर्यत आणि महाराष्ट्र, बैल आणि शेतकरी हे नाते पूर्वापार चालत आलेले असून, बैल आणि शेतकरी या नात्यात बैलगाडा शर्यतीच्या आडून भेद निर्माण करण्याचे प्रयत्न केले गेले आणि बैलगाडा शर्यतींमुळे बैलांचा छळ होतो असे भासवून न्यायालयातून बैलगाडा शर्यतींवर बंदी आणली गेली. मुळातच शेतीसाठी नांगराचा वापर कमी होत गेल्याने त्या जागी मोठ्या प्रमाणात ट्रॅक्टरचा वापर सुरू झाल्याने आधीच हद्दपार झालेला बैल हा फक्त बैलगाडा शर्यतीमुळे शेतकऱ्यांकडे टिकून होता. पण शर्यत बंदीनंतर हे बैलही विकले गेले आणि शेतकऱ्याच्या दावणीला दिसणारी बैलजोडी फक्त चित्रातच दिसू लागली, अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली होती. महाराष्ट्राला बैलगाडा शर्यतीची अनेक वर्षांची परंपरा आहे. पारंपरिक वारसा व शेतकऱ्यांचा आवडता छंद म्हणून बैलगाडा शर्यतीकडे पहिले जाते. बैलगाडा शर्यतीमुळे देशी जनावरांचे (गाय-बैल) संगोपन चांगल्या पद्धतीने होते. महाराष्ट्रात विविध भागांत बैलांच्या शर्यतीचे विविध प्रकार असून, त्या भागात वेगवगळ्या नावाने ही शर्यत साजरी केली जाते. सातारा, पुसेगाव, सांगली, कराड, मुंबईजवळच्या ग्रामीण भागांत, पुणे जिल्ह्यातील काही भागांत हा खेळ वार्षिक यात्रांना मोठ्या आनंदाने खेळला जातो.

## कानठळ्या बसवणाऱ्या उन्मादाला थोपवताना

– सायली परांजपे

भाग : १

**एकाच नेत्याप्रती असलेल्या अंधभक्तीने इतका कळस गाठलेला आहे, की चार राष्ट्रांच्या परिषदेदरम्यान जिन्यावरून उतरताना आपला नेता अग्रभागी होता, एवढ्यावरून आपण 'विश्वगुरु' बनलो, आपला नेता जगाचा तारणहार बनला या भावनेने तमाम अनुयायांनी हा क्षण या ना त्या प्रकारे साजरा केला. काहींनी हेच छायाचित्र आपले स्टेटस म्हणून ठेवले. हीच सामूहिक धुंदी परस्पर नात्यांतल्या संबंधांना सुरुंग लावताना दिसत आहे. तर्क आणि मीमांसेशी फटकून वागणारे हे समाजमन अंधभक्तीच्या नादात या देशाला आकार देणाऱ्या लोकशाही मूल्यांनाच तिलांजली द्यायला निघाले आहे...**

आजूबाजूचे नातेवाईक, मित्रमंडळी सगळे पूर्वीसारखेच आहेत, त्यांच्याशी संवादाची साधनं तर दहा वर्षांपूर्वी होती त्या तुलनेत खूपच वाढली आहेत, तरीही एक प्रकारची पोकळी, एकप्रकारचा एकटेपणा गेल्या काही वर्षांपासून तीव्रतने जाणवतोय. याचं कारण तसं अगदी स्पष्ट आहे, पण कारणामागचं कारणही तेवढंच गुंतागुंतीचं आहे. नातेवाईक, मित्रमंडळींचा गोतावळा पूर्वीसारखाच असूनही जाणवणारं तुटलेपणामागचं एक ठळक कारण म्हणजे, या गोतावळ्याच्या आणि आपल्या राजकीय आकलन आणि विचारसरणीतला फरक.

नात्यातले अवघडलेपण

एखाद्या कौटुंबिक समारंभानिमित्त जमलेल्या नातेवाईकांच्या गप्पा, व्हॉट्सॲप ग्रुप्सवर फॉरवर्ड केले जाणारे मेसेजेस या सगळ्यात जो अभिनिवेष, द्वेष सध्या ओसंडून वाहतोय, त्याचा भाग होण्याची अजिबात इच्छा नाही, हा एक भाग झाला. पण त्याचा प्रतिवाद करणं म्हणजे दगडावर डोकं आपटून घेण्यासारखं आहे, या जाणिवेतून येणारी हतबलता, एरवी बुद्धिमान व संवेदनशील वाटणाऱ्या मंडळींचे सामाजिक, विशेषत: राजकीय, विचार एवढे टोकाचे का याचं आकलनच न झाल्यामुळे येणारी उद्विग्नता खूप मोठी आहे. या सगळ्यापासून दूर जावं म्हटलं तर कोणाकोणापासून दूर जाणार हा प्रश्न समोर येतो. हे सगळे विषय टाळून काहीतरी वेगळंच बोलत राहू म्हटलं तरी एक प्रकारचं अवघडलेपण बोचत राहतं. शेवटी उरतं काय, तर कधीच भरून निघणार नाही अशी पोकळी, कधीच दूर होणार नाही असा एकटेपणा.

कारण, आपण ज्यांच्यासाठी अतार्किक, अविचारी, विखारी, अपरिपक्व ही सगळी विशेषणं वापरतोय किंवा या आणि यासारख्या अनेक विश्लेषणांऐवजी 'अंधभक्त' हा एकच शब्द वापरतोय ते बहुसंख्येने आहेत, आपण अल्पसंख्य आहोत हे सत्य आहे. या एकटेपणामागचं कारण म्हटलं तर एवढं सोपं आहे.

विखार आणि विद्वेष

अर्थात, आपल्यापेक्षा वेगळी विचारसरणी असणारे लोक यापूर्वी आजूबाजूला नव्हते का, हा साधा प्रश्न विचारून बघितला तर असं लक्षात येतं की असे लोक नेहमीच होते. आमच्या कुटुंबात गांधीवादी, कम्युनिस्ट, समाजवादी आणि अगदी हिंदुत्ववादी असे भिन्न विचारसरणीचे लोक होते. मित्रमंडळींमध्येही अर्थातच वेगवेगळ्या विचारसरणीचे लोक होते. तरीही आज जे अवघडलेपण जाणवतंय, जो एकटेपणा सलतोय तो पूर्वी नक्कीच नव्हता. आज अनेक नातेवाईकांशी नातं टिकवून ठेवायचं असेल, तर काही विषय वर्ज्यच ठेवायचे ही पूर्वअट होऊन गेली आहे. ती कदाचित दहा-पंधरा वर्षांपूर्वी नव्हती. प्रत्येक माणूस वेगळा आहे, त्याची विचार करण्याची पद्धत वेगळी असणार, त्याची श्रद्धास्थानं वेगळी असणार हे गृहित धरलेलं होतं. किंबहुना, वेगळं असणं ती माणूस असल्याची खूण होती. ठराविक विचारसरणीच्या साच्यात जाऊन बसण्यापेक्षा वेगळेपणा स्वीकारण्याचे संस्कार नकळत झालेले होते. तरीही एकचालकानुवर्ती हिंदूराष्ट्र वगैरे विचार समजून घेणं पूर्वीही शक्य नव्हतं, हे तर मान्य केलं पाहिजे. पण त्याचा प्रतिवाद होऊ शकतो, काही वेगळे अनुभव आले तर कट्टर जातीयवादी लोकांचे विचार बदलू शकतात असा विश्वास कुठेतरी तग धरून होता.

निकोप वाद-संवादाची जागा उन्मादाने घेतली

मात्र, गेल्या काही वर्षांत नातेवाईक, मित्रमंडळीतल्या अनेकांची पक्की होत गेलेली मतं, विचार, दृष्टिकोन बघून त्यांच्यात बदल होईल अशा आशेला जागाच राहिलेली नाही आणि हे भयावह आहे. यात आणखी एक मुद्दाही महत्त्वाचा आहे. वेगळ्या जातीच्या लोकांना कमी लेखणारे, वेगळ्या धर्माच्या लोकांचा द्वेष करणारे लोक पूर्वीपासून अस्तित्वात तर आहेतच, पण ते आपली मतं आजवर कुजबुजत्या आवाजात मांडत होते. गेल्या काही वर्षांत त्यांच्या विचारसरणीचे लोक सत्तेत आल्यामुळे असावं कदाचित पण कुजबुजत मांडली जाणारी मतं घणाघाती आवाजात मांडली जाऊ लागली आहेत. या मतांना वास्तवाचा, तर्काचा आधार नसूनही अत्यंत स्पष्टपणे, ठामपणे ती मांडली जात आहेत. त्याचा प्रतिवाद करायचा प्रयत्न कोणी केला तर सभ्यतेची पातळी सोडून प्रत्युत्तरं दिली जाऊ लागली आहेत. आम्ही म्हणतो तेच बरोबर हा उन्माद तर आला आहेच, पण अगदी तर्काच्या कसोटीवर ते चुकीचं असलं तरी तर्काला कोण विचारतं? आम्ही सत्तेत आहोत आणि आता आम्ही कोणाचं ऐकणार नाही असं स्पष्ट बोलून दाखवण्यापर्यंत अनेकांची मजल गेली आहे.

नरेंद्र मोदी नावाचा 'विश्वनेता' भारताला लाभला आहे आणि त्याबद्दल स्वत:ला सुदैवी समजण्याऐवजी तुम्ही मोदींवर शंका कशाला घेत बसला आहात, असा प्रश्न मला काही महिन्यांपूर्वी एका नातेवाईकाने विचारला होता. 'काही झालं तरी त्या विदेशी बाईच्या मुलापेक्षा मोदी शंभर पटींनी बरा' अशी टिप्पणीही या नातेवाईकाने केली होती. त्यावर मोदी यांच्या भाषणातल्या काही विसंगती मी दाखवून दिल्या, तेव्हा 'असल्या गोष्टींना कोण विचारतं? आज बहुमत मोदींसोबत आहे आणि ते तसंच राहणार आहे. तुम्ही पुरोगामी लोक हे ॲक्सेप्ट का करत नाही' असा भीषण युक्तिवाद त्यावर ऐकायला मिळाला होता.

यावर काय बोलावं हे मला आजही माहीत नाही. गप्प बसणं किंवा या व्यक्तीपुढे हा विषय न काढणं याशिवाय दुसरा मार्ग दिसत नाही. आजवर आमच्यावर खूप अन्याय झालाय, आता मोदींच्या काळात आम्हाला चांगले दिवस येणार आहेत असा काहीसा हा पवित्रा आहे. आता यांच्यावर पूर्वी नेमका काय अन्याय झालाय आणि मोदींच्या काळात असे काय चांगले दिवस यांना दिसताहेत ते विचारण्याची सोय नाही. कारण, ते नाही दिसले तरी आम्ही मोदींनाच मत देणार असा अनाकलनीय ठामपणा त्यांच्यात आहे.

मोदीभक्तीत लीन आप्तेष्ट

काही वर्षांपूर्वी आणखी एका कौटुंबिक समारंभात गुजरातमध्ये मोदींनी कसा विकास केलाय वगैरे चर्चा रंगली होती. गुजरातच्या तथाकथित विकासाचं मॉडेल कसं फोल आहे, याबद्दलची गुजरातमधल्या पत्रकारांनीच चालवलेली एक लेखमाला मी वाचली होती. गुजरात हे अगदी काँग्रेसच्या काळापासून कसं व्यापाराला प्राधान्य देणारं राज्य आहे, लायसन्सिंगसाठी सिंगल विंडो प्रणाली तिथे कशी खूप पूर्वीपासून आहे, परंतु, ग्रामीण भागात आजही विकास कसा पोहोचलेला नाही, आरोग्य आणि सामाजिक न्यायाच्या बाबतीत हे राज्य कसे पिछाडीवर आहे, हे त्या लेखमालेच्या संदर्भाने सांगण्याचा प्रयत्न करून बघितला. त्यातले मुद्दे खोडून काढण्याएवढी माहिती अर्थातच कोणाकडे नव्हती, पण कोणाच्याही चेहऱ्यावरची साधी माशी हलली नाही. एक नातेवाईक मात्र म्हणाले- 'मोदी फार काही विकास वगैरे करतील यावर माझाही विश्वास नाही. मी फक्त त्यांना एकाच कारणासाठी मत दिलं आणि देईन. ते म्हणजे ते मुसलमानांची चांगली ठासताहेत.' आता यावरही गप्प बसण्याशिवाय काही पर्याय नव्हता. कदाचित मोदींचं समर्थन करणाऱ्या बहुतेकांच्या मनात हेच असेल, माझ्या समोरच्या व्यक्तीने निदान प्रामाणिकपणाने ते मांडलं होतं, असाही विचार मनात आला. तरीही इतिहासातले खरे-खोटे दाखले देऊन हा हिंसक विचार एवढ्या स्पष्टपणे मांडण्याचं धारिष्ट्य आपल्याकडे आलं आहे, हेही पुरेसं धोकादायक आहे.

**भयावह अभिनिवेश** मुळात मुसलमान समाजाचा बागुलबुवा आपल्या मनात का आणि कसा भरवला गेलाय हेच समजून घेणं सध्या कठीण बनलं आहे. बरं, परिचयातल्या मुस्लिमांचा द्वेष करणाऱ्या आणि त्यांची 'ठासणारे' म्हणून मोदींवर आंधळं प्रेम करणाऱ्या लोकांच्या मनात हा द्वेष कसा निर्माण झाला असावा हेही कळत नाही. यातल्या बहुतेक मंडळींचा मुसलमानांशी अपवाद वगळता थेट असा संपर्क आलेलाही नसेल. इतिहासातल्या अतिशयोक्त वर्णनांच्या किंवा सांगोवांगीच्या गोष्टींच्या आधारे एका संपूर्ण समाजाबद्दल मनात द्वेष भिनवून घेण्याची मानसिकता कोठून येते? **क्रमश :**

पान १ वरुन

### व्यसनापासून दूर राहा व..

जिल्हा मुख आरोग्य अधिकारी डॉ. रोहन वायचळ,जिल्हा लेखा अधिकारी श्रीमती वैशाली थोरात ,तंबाखू नियंत्रण कक्षेचे समुपेशक श्रीमती मंजूश्री मूळे, सामाजिक कार्यकर्ते अमित महाडिक व नितीन निकंबे ,श्री राऊत आदि उपस्थित होते.यावेळी अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी उपस्थितांना जिल्हा परिषद परिसर, जिल्हा परिषदेच्या सर्व उपक्रमांमध्ये स्वच्छता राखण्याचे आवाहन केले. तसेच तंबाखूचे सेवन करून कुठेही थुंकू नये, असे स्पष्ट केले.जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय पाटील यांनीही तंबाखू सेवनाविरोधात मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात जागतिक तंबाखू विरोधी दिनाचे औचित्य साधून आयोजित निबंध, चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात आले. तसेच उपस्थितांना जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त शपथ देण्यात आली. त्यानंतर दीनदयाळ उपाध्याय दंत महाविद्यालय येथील तपासणी वाहनाचे उद्घाटन श्री. कोहिणकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोनिका हिरेमठ, सच्चिदानंद बांगर, शशिकांत ढेकळे, स्वाती गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

### एलपीजी गॅसच्या दरांत मोठी घट..

गॅस सिलेंडर १७२५ रुपयांना विकला जात आहे, तर चेन्नईमध्ये एलपीजीची किंमत १९७३ रुपये आहे. दिल्लीत व्यावसायिक एलपीजी सिलेंडर १८५६.५० रुपयांवरून ८३.५० रुपयांनी कमी होऊन १७७३ रुपयांनी विकला जात आहे. तर कोलकातामध्ये व्यावसायिक सिलेंडरची किंमत १९६०.५० रुपयांवरून १८७५.५० रुपयांपर्यंत कमी करण्यात आली आहे. मुंबईत व्यावसायिक गॅस ८३.५० रुपयांनी स्वस्त झाला असून १८०८.५० रुपयांवरून १७२५ रुपयांवर येऊन पोहोचला आहे. तसेच, चेन्नईमध्ये एलपीजी गॅस २०२१.५० रुपयांवरून ८४.५० रुपयांनी घसरून १९३७ रुपयांवर पोहोचला आहे. गेल्या काही महिन्यांपासून घरगुती एलपीजीच्या किमतीत कोणताही बदल झालेला नाही. गेल्या वेळी मार्चमध्ये घरगुती सिलेंडरच्या किमतींत बदल करण्यात आला होता. त्यानंतर घरगुती सिलेंडरच्या किमतींत कोणताही बदल झालेला नाही. घरगुती एलपीजीच्या किमती मुंबईमध्ये ११०२.५ रुपये, दिल्लीमध्ये ११०३ रुपये, लेहमध्ये १३४०, भोपाळमध्ये ११०८.५, जयपूरमध्ये ११०६.५, बंगळुरूमध्ये ११०५.५ रुपये आणि श्रीनगरमध्ये १२१९ रुपये इतकी आहे. व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या किमतींमध्ये दिलासा देण्याबरोबरच जेट इंधनाच्या (एअर फ्युएल) किमतीतही तेल कंपन्यांनी कपात केली आहे. किंमतीत सुमारे ६,६०० रुपयांची घट झाली आहे. याचा परिणाम आगामी काळात विमान प्रवासावर होऊ शकतो. १ जूनपासून नवे दर लागू करण्यात आले आहेत. तेल कंपन्यांनी घरगुती एलपीजी सिलिंडरच्या किमतींत कोणताही बदल केलेला नाही.

### अहमदनगर जिल्ह्याला अहिल्यादेवी

विविध मंदिरांचा जीर्णोद्धार त्यांनी केला असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

राज्य शासनाने मेंढपाळांसाठी कर्ज योजना मंजूर करत त्यांच्यासाठी पावसाळ्यात चराई रान राखून ठेवण्याचा निर्णय घेतला.राज्यातील धनगर वाड्यांना मुख्य रस्त्यांशी जोडण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद केली. धनगर समाजातील व्यक्तींसाठी दरवर्षी २५ हजार घरे बांधण्याचा निर्णय घेतला असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.यावेळी पालकमंत्री श्री. विखे पाटील, आमदार श्री. पडळकर यांचीही समयोचित भाषण झाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक आमदार प्रा. शिंदे यांनी केले.यावेळी अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमधील पुरस्कार विजेत्या महिलांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.सर्वप्रथम मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच मान्यवरांनी परिसरात उभारण्यात आलेल्या शिल्पसृष्टीची पाहणीही केली.

### देशातील हिंदू मंदिरांमध्ये

आणि या दरम्यान तापमान उणेमध्ये होते. यामुळे खूप त्रास व्हायचा. नितीन गडकरी म्हणाले की, प्रकल्पांना होणारा विलंब कमी करण्यासाठी आणि बांधकामाचा खर्च कमी करण्यासाठी तपशीलवार प्रकल्प अहवाल (डीपीआर) अचूक बनवण्याची गरज आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेबाबत दिलेल्या माहितीनुसार, नितीन गडकरी यांनी बुधवारी (३१ मे) भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण च्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली आणि राष्ट्रीय महामार्गाच्या विकासाच्या विविध पैलूंवर विस्तृत चर्चा केली.कार्यक्षमता वाढवण्यासाठी, अडथळे दूर करण्यासाठी आणि नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याच्या मार्गांवर बैठकीत चर्चा झाली, असं अधिकृत निवेदनात म्हटलं आहे. गडकरींनी राष्ट्रीय महामार्गांवर कार्यक्षमता वाढवणं आणि 'प्रवास सुलभता' यांवर लक्ष केंद्रित करणारे दोन मोबाईल ॲप्सही लॉन्च केले आहेत.

### दुर्गराज रायगडवर ३५० व्या

सकाळी ९ वाजता शिवराज्याभिषेक सोहळा
सकाळी १०.३० वाजता श्री शिवसन्मान सोहळा
सकाळी ११ वाजता शिवपालखी सोहळा

या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तरेस राज्याचे मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे तसेच श्रीमंत शाहूराजे छत्रपती, छत्रपती उदयनराजे भोसले हे देखील या कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार आहेत. तिथीप्रमाणे २ जूनला पहाटेपासूनच या सोहळ्याला सुरुवात होणार आहे. मुख्य गोष्ट म्हणजे चांदीच्या पालखीचे आज पूजन करण्यात आले. तसेच शिवाजी महाराजांच्या काळातील होन देखील यावेळी राज्याभिषेक सोहळ्याच्या दरम्यान वापरले जाणार आहेत. गागाभट्ट यांचे सतरावे वंशज महंत सुधीर दास महाराज हा विधी करणार आहेत.

तारखेप्रमाणे ६ जून रोजी सोहळा

तर ६ जून रोजी तारखेप्रमाणे शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला जाणार असून संभाजीराजे छत्रपती यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडणार आहे. २००७ पासून सुरू झालेल्या या सोहळ्याला आता व्यापक स्वरुप प्राप्त झालं असून ६ जून रोजी रायगडवर दोन ते अडीच लाख शिवभक्त जमा होतात.

मुंबई गोवा महामार्गासह इतर राज्य मार्गांवर अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर परिवहन विभागानं हे आदेश काढलेत. बुधवारी मध्यरात्री १२ वाजल्यापासून या आदेशाची अमलबजावणी करण्यात येणार आहे. १,२ जून आणि ५, ६ जून या दिवशी अवजड वाहनांना बंदी असेल. १६ टन आणि त्यापेक्षा जास्त वजन क्षमतेच्या जड, अवजड वाहनं, ट्रक, मल्टी एक्सल ट्रेलर यांना वाहतूकीसाठी बंदी घातली आहे. महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सध्या सुरू आहे. तर राज्यभरातून येणाऱ्या शिवभक्तांची वाहतूक कोंडीने गैरसोय होऊ नये म्हणून अवजड वाहतूक बंदीचा निर्णय घेतलाय.

### स्वित्झर्लंड भारताशी मुक्त व्यापार

कोणकोणत्या क्षेत्रात संधी उपलब्ध होतील, याची माहिती धोरणकर्त्यांना तसेच उद्योगजगताला देण्यासाठीच आपण मुंबई भेटीवर आलो असल्याचे डॉ. हेकनर यांनी सांगितले.

कोरोना संसर्गानंतर स्विस दूतावासातील सर्व कर्मचाऱ्यांना कोविशिल्ड मात्रा उपलब्ध करून दिल्याबद्दल हेकनर यांनी भारताचे आभार मानले. स्वित्झर्लंडला भारताकडून अधिक गुंतवणूक तसेच नाविन्यता व संशोधन सहकार्याची अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले. यश चोप्रा यांनी स्वित्झर्लंड येथे आपल्या चित्रपटांचे चित्रीकरण केल्यामुळे दरवर्षी अडीच ते तीन लाख भारतीय पर्यटक स्वित्झर्लंडला भेट देत असल्याचे त्यांनी सांगितले.स्वित्झर्लंड भारताचा ११ वा मोठा गुंतवणूकदार देश असून मुंबईतील वाणिज्य दूतावास १०८ वर्षांपासून कार्यरत असल्याचे राज्यपालांनी यावेळी नमूद केले. स्वित्झर्लंड सूक्ष्म तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान व औषधीनिर्माण या क्षेत्रातील कौशल्यप्रधान देश असून उभय देशांत कौशल्य आदान - प्रदान करार झाल्यास भारतातील युवकांच्या कौशल्याचा अनेक देशांना फायदा होईल,असे राज्यपालांनी सांगितले.विद्यापीठांचा कुलपती या नात्याने उभय देशांमधील विद्यापीठांमध्ये विद्यार्थी - तसेच अध्यापक - आदानप्रदान वाढावे, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली. बैठकीला स्वित्झर्लंडचे मुंबईतील वाणिज्यदूत मार्टिन माईर हे देखील उपस्थित होते.

### तंबाखूजन्य पदार्थांसाठी ओटीटी

उत्पादनाचा उपयोग करण्यात आलेल्या कार्यक्रमांच्या सुरुवातीला आणि मध्ये कमीत कमी तीस सेकंदांसाठी तंबाखू विरोधातील चेतवाणी देणारी जाहिरात दाखवणे अनिवार्य असणार आहे. तंबाखू विरोधात जागरुकता निर्माण करण्यासाठी आरोग्य विभागाकडून हा उपक्रम राबण्यात येतो. तसेच ओटीटी माध्यमांवरील कार्यक्रमांना तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करण्याच्या कालावधीत स्क्रीनच्या खाली तंबाखूविरोधात एक प्रमुख संदेश देण्यास देखील अनिवार्य करण्यात आले आहे. सर्वसाधारपणे चित्रपटांमधील अनेक गोष्टींचा परिणाम बऱ्याचदा आपल्या आयुष्यावर होत असताना पाहायला मिळते. चित्रपटांमधील बऱ्याच गोष्टींचे अनुकरण करण्याचा प्रयत्नही तरुण पिढी हल्ली करत असते. ओटीटी माध्यमांवर सेन्सॉर नसल्यामुळे बऱ्याच गोष्टी सर्रासपणे या माध्यमांवर दाखवल्या जातात. तसेच या माध्यमांचा वापर करणारी तरुण पिढीची संख्या भारतात अधिक आहे. या गोष्टींचा विचार करुन केंद्रीय आरोग्य विभागाने ओटीटी माध्यमांसाठी हे नियम अनिवार्य केले आहेत.




### अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासकडून धार्मिक विविधतेला चालना देणारे उपक्रम : राजन साळवी

अक्कलकोट/प्रतिनिधी: श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासकडून धार्मिक विविधतेला चालना देणारे उपक्रम हे उल्लेखनीय असल्याचे मनोगत रत्नागिरी, लांजा-राजपूर-साखरपा विधानसभा मतदार संघाचे आमदार राजन साळवी यांनी व्यक्त केले.

ते तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहपरिवार आले असता न्यासाचे पुरोहित संजय कुलकर्णी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत सुमित वाघदरे, शुभम साळवी, दुर्गेश साळवी, संजय साळवी, अथर्व साळवी हे उपस्थित होते.यावेळी न्यासाचे एस.के.स्वामी, सिद्धाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, धानू उमदी, नामा भोसले, दत्ता माने, प्रवीण घाटगे, निखिल पाटील, राजू पवार, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, समर्थ घाटगे, शरद भोसले यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स ॲंड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# बार्टीच्या समतादूत प्रकल्पाचे क्षेत्रीय प्रकल्प अधिकारी व समतादूतांची कार्यशाळा संपन्न



पुणे/विशेष प्रतिनिधी : बार्टीच्या समतादूत प्रकल्पाचे क्षेत्रीय प्रकल्प अधिकारी व समतादूतांची दोन दिवसीय कार्यशाळा यशस्वी संपन्न कार्यशाळेचे उद्घाटक व अध्यक्ष सुनील वारे महासंचालक बार्टी यांनी उद्घाटन प्रसंगी उपस्थित सर्व प्रकल्प अधिकारी व समतादूतांना संबोधित करतांना अशा कार्यशाळेप्रमाणे कार्यशाळा यापूर्वी कधी झालेली नाही. ज्यामध्ये सर्वांचा इतका उत्साह दिसून येत आहे.

समतादूत प्रकल्पातील सर्व मनुष्यबळ विशेषतः क्षेत्रीय प्रकल्प अधिकारी व समतादूत हे बार्टी चा अविभाज्य घटक असून शासनाच्या योजना तळागाळा पर्यत खऱ्या अर्थाने पोहचविण्यासाठी जर कोणते मनुष्यबळ आजच्या घडीला कार्यरत असेल तर ते समतादूत आहेत,की ज्यांनी आतापर्यंत अतिशय प्रामाणिकपणे आपले कर्तव्य पार पाडले आहे.

समतादूत व प्रकल्प अधिकारी यांची वेतनवाढ शासकीय नियमानुसार होईल तसेच यापुढे देखील प्रकल्प अधिकारी व समतादूतांच्या पाठीशी बार्टी मुख्यालय खंबीरपणे उभे असेल असे आश्वासन यावेळी मा.महासंचालक यांनी दिले व भविष्यातील काम कामकाजासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यशाळेचे उद्घाटनपर कार्यक्रम पार पडला या उद्घाटनप्रसंगी श्रीमती स्नेहल भोसले विभाग प्रमुख,डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण विभाग प्रमुख, निबंधक इंदिरा आस्वार, विभाग प्रमुख रविंद्र कदम, अनिल कारंडे विभाग प्रमुख, विभाग प्रमुख सतीश पाटील,कार्यालयीन अधीक्षक सचिन जगदाळे, समतादूत सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक नसरीन तांबोळी यांच्या हस्ते माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यशाळेचे प्रास्ताविक श्रीमती इंदिरा आस्वार,निबंधक यांनी केले व समतादूतांना कामकाज संदर्भात महत्वाच्या सूचना दिल्या. समतादूत प्रकल्प म्हणजे समाजाची ज्योत आहे व तेवत ठेवण्यासाठी सतत प्रयत्न करणे हे समतादूतांचे काम आहे. समतादूतांच्या समस्या सोडवण्या करिता मा.सचिव सुमंत भांगे व सूनिल वारे सर सकारात्मक आहेत.असे संबोधित करित इंदिरा आस्वार यांनी समतादूतांमध्ये प्रकाशाची ज्योत प्रज्वलित केली. त्यानंतर रविंद्र कदम विभाग प्रमुख, जात पडताळणी विभाग यांनी समतादूत हा तळागाळातील समाजाचा चेहरा आहे आणि समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहचणारा बार्टीचा एक महत्त्वाचा दुवा आहे. असे उद्बोधन करित समतादूतांमध्ये कार्याबद्दलची प्रशंसा केली.

विभाग प्रमुख, डॉ.सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी समतादूतांना विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील कटू प्रसंग सांगत समतादूत हा समतेचा वाहक आहे, समता-बंधूता-सामाजिक न्यायाचा व भारतीय संविधानाचा चालता-बोलता समस्या निराकरण केंद्र आहे.

समाजाच्या प्रत्येक समस्यांच्या समाधानासाठी एक आधारस्तंभ आहे. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा खरा अनुयायी आहे व बाबासाहेबांनी सोसलेला संघर्ष समतादूतांच्या वाट्याला येणे एक भाग्यवंत अनुयायांच्या स्वप्न आहे व ते स्वप्न पूर्ण करणे समतादूतांचे कार्य आहे तसेच समतावादी महापुरुषांच्या जीवन कार्यावर प्रबोधन करिता समतादूतांना सखोल मार्गदर्शन केले.

कार्यशाळेचा शेवट हा मा. महासंचालक, वारे यांचे हस्ते उत्कृष्ट काम केलेले प्रकल्प अधिकारी व समतादूत यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. तसेच समतादूतांच्या समस्या -अडचणी जाणून घेऊन त्यावर तात्काळ कार्यवाही करू असे देखील सांगण्यात आले. तदनंतर विभाग प्रमुख डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी माननीय महासंचालक व मान्यवरांचे तसेच आयोजक समतादूत प्रकल्पाची टीमचे व उपस्थित सर्व प्रशिक्षणार्थीचे आभार मानले.

मा. महासंचालक सुनील जी वारे,स्नेहल भोसले विभाग प्रमुख,श्रीमती इंदिरा आस्वार निबंध,विभाग प्रमुख डॉ.सत्येंद्रनाथ चव्हाण, वृषाली शिंदे विभाग प्रमुख, रविंद्र कदम विभाग प्रमुख,अनिल कारंडे विभाग प्रमुख तसेच सचिन जगदाळे कार्यालयीन अधीक्षक ,श्रीमती नसरीन तांबोळी सहाय्यक प्रकल्प व्यवस्थापक तसेच सोलापूर जिल्हा प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे,श्रीमती तेजस्वी सोनवणे मनोज खंडारे विशाखा शहारे, उषा भिंगारे व पायल डोके व मंगल तसेच कार्यक्रमाचे प्रशिक्षणार्थी यांचे सूत्रसंचालन केलेले विजय बेदरकर,प्रकल्प अधिकारी,अकोला व चंद्रकांत इंगळे समतादूत, नाशिक यांनी केले .

# सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार सन्मानित



अक्कलकोट/प्रतिनिधीः गांवात महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार सन २०२३/२०२४ . मध्ये सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्याना महाराष्ट्र शासन ग्राम पंचायत स्तरिय गौरव पुरस्कार गेल्या तीन वर्षां पासुन गांवात सामाजिक कार्य करत असलेल्या कायदा सुव्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी कोरोना काळात जीवाची पर्वा न करता अहोरात्र मेहनत करत सामाजिक क्षेत्रात लोकांना आरोग्य , पाणी, या साठी प्रयत्नशिल होते

त्यामुळे जगदेवी भीमशा मुरळी, महानंदा सिध्दारुढ वमने, ललिता सिध्दारुढ भटारे,गंगुबाई भिमाशंकर कुबळे याना अहिल्यादेवी होळकर पुरस्कार सन्मानचिन्ह प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले

व सामाजिक कार्यास शुभेच्छा देण्यात आले या कार्यक्रमास ग्रामसेवक चव्हाण, सरपंच श्रीकांत भैरामडगी. सदस्य शिवानंद घोळसगांव. सदस्य श्रीकांत इंडे. घाळय्या मठपती सर. महादेव सोनकावडे . ग्राम पंचायत कर्मचारी. अंगणवाडी सेविका मदतनीस व गांवातील महिलांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला..

# लताबाई गोतसुर्वे व शोभा माने यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार



आचेगांव/प्रतिनिधी : आचेगांव ता. दक्षिण सोलापूर ग्रामपंचायतीच्या वतीने शासनाच्या आदेशानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त ग्रामपंचायत क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दोन कर्तबगार महिला म्हणून लताबाई अशोक गोतसुर्वे व शोभा तुळजाराम माने यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

शासनाने नेमून दिलेल्या अटी -शर्ती नुसार आलेल्या अर्जाची पडताळणी करून निवड समितीने लताबाई गोतसुर्वे व शोभा माने यांची निवड केली,

त्या नुसार ग्रामपंचायत कार्यालयात सदर पुरस्कर्त्यांना सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल श्रीफळ व शासनाने ठरवून दिल्या नुसार रोख रक्कम देऊन गौरवण्यात आले. सदर पुरस्कार महिला व बालकल्याण माध्यमातून देण्यात आले.

यावेळी सरपंच विश्रांती पाटील, शावरसिद्ध पाटील, तंटामुक्त अध्यक्ष भगवान गोतसुर्वे, पोलीस पाटील प्यारन मुल्ला,उपसरपंच रफिक मुल्ला, महिबूब पाटील, नागप्पा कांबळे ताजोद्दीन बिराजदार, इरफान पटेल,ग्रामपंचायत सदस्या श्रीम मंगल गोतसुर्वे, गौतमी बलवान गोतसुर्वे, रेश्मा महिबूब पाटील, शांताबाई शिलेणी, सावित्रा कांबळे रायप्पा जळगोडर, सागर कोळी आदिसह गावकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे औचित्य साधून ग्रामपंचायत कर्मचारी म्हणून आपली सेवा बाजावून सेवा निवृत्त झालेबद्दल पाणीपुरवठा कर्मचारी शेकू बिराजदार, कारकून सिद्राम नवगिरे, सफाई कामगार शावरसिद्ध भणजे यांचा सेवा निवृत्तीबद्दल सत्कार करण्यात आले. यावेळी बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते. सूत्रसंचालन शावरसिद्ध पाटील यांनी केले.

# मुख्यमंत्री सहाय्यता प्रमुख मंगेश चिवटे यांचा सत्कार



मुंबई : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष कार्यकारी अधिकारी तथा मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांचा सत्कार सोमेश्वर वाडी यांच्या हस्ते करण्यात आला. आरोग्य दूत म्हणून अख्खा महाराष्ट्राला परिचित असलेले मंगेश चिवटे यांनी आरोग्य क्षेत्रात भरीव कामगिरी केली असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विश्वासू कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. २०१४ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाची निर्मिती केली होती. या माध्यमातून महाराष्ट्रातल्या अनेक रुग्णांना फायदा झाला होता. त्याच धर्तीवर २०१९ मध्ये शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाची निर्मिती करून या संघटनेचे जाळे संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण करून आरोग्य सेवा सुदृढ करण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर गेली पाच वर्षापासून ते कार्यरत असून खा श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील रुग्णांचे प्रश्न सोडवण्याचे काम करत आहेत. महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी आपत्कालीन संकट आली

त्या त्या ठिकाणी मदत करण्याच्या कामात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.अशा आदर्श व्यक्तिमत्वाला महाराष्ट्रातून विविध सामाजिक संघटनेच्या वतीने पुरस्कार देऊन गौरविण्यात येते आहे.

पुणे येथे पुरस्कार कार्यक्रमात बसव अभ्यासक व सामाजिक कार्यकर्ते सोमेश्वर वाडी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले.यावेळी सिध्दू गोगी व गावगाथा चे संपादक धोंडप्पा नंदे उपस्थित होते


# सौ.उज्वला बदामे व सौ.लक्ष्मी कांबळे यांना पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार सन्मानित

टाकळीवाडी/नामदेव निर्मळे : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील माजी सरपंच सौ उज्वला बदामे आदर्श उत्कृष्ट महिला व सौ लक्ष्मी कांबळे शिपाई कामगार कोरोना काळात अतिशय महत्त्वाची कामगिरी बजावणारे या दोन कर्तबगार महिलांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त प्रत्येक वर्षी ३१ मे ला उत्कृष्ट कार्याबद्दल हा पुरस्कार देण्यात येणार आहे. सन्मानपत्र ,सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, देऊन या दोन कर्तबगार महिलांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी गावचे सरपंच मंगल बिरणगे, माजी सरपंच विद्यमान ग्रामपंचायत सदस्य तुकाराम चिगरे, माजी उपसरपंच विद्यमान सदस्य भरत पाटील ,माजी सुभेदार संजय बदामे, उद्योजक संजय कुंभार, ग्रामपंचायत सदस्य भरत निर्मळे, भरमु बदामे,नाना कांबळे, सर्व ग्रामपंचायत कर्मचारी, नागरिक उपस्थितीत होते. सर्वप्रथम या पुरस्काराचे मानकरी ठरल्याबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.



## शब्दकोडे क्र १५



आडवे शब्द १. चिंचा आल्यात पाडाला- या गीतातील पुढील ओळ ७. वैदूकडची औषधे १०. थेट, सरळ ११. हा खाताना घशात काटा अडकतो १२. मालाचा उठाव १४. मिळाला म्हणजे फायद्याचाच ठरला की! १५. जिजाबाईंचा पुत्र १७. जिरवण्याची ताकद २०. आवडता, प्रिय २१. नंतरचे नवराबायको २२. नमुनेदार २५. दक्षिणा वाटण्याची जागा २७. अति भयानक २९. रेशमाची गुंडाळी (अ.व.) ३०. 'कँटीन' असल्यावर हा कशाला? ३३. भलतेच विरुद्ध ३५. निर्बुद्ध, ढ ३६. दोनवेळा म्हटल्यास कटकट ३७. या काळातील घटना कुणाला कळल्यात! ३८. चकमक ४०. त्वरित, रातोरात ४१. रानरेडा ४२. नातवंडे म्हणजे दुधावरची --! ४३. दुलई ४४. उत्तराधिकारी ४७. फटाक्यात ठासून भरलेला मसाला ४८. काळ्या तोंडाचे माकड ५१. खोदकाम ५२. लिंबूपाणी ५४. न्याहरी-कधी उपासाची, कधी दिवाळीची! ५५. दुसऱ्यासाठी खिशाला चाट ५७. ओळख पटवणारे वैशिष्ट्य ५९. संपणे ६०. जन्मदाता, पिता ६१. माळी ६३. जगातील सगळ्यात घातक कीटक ६५. 'आ'काराची रेषा ६६. आमिषादाखल दाखवण्याचे कंदमूळ ६७. हे शहर काही आता पेन्शनरांचे राहिलेले नाही ६८. पंख ६९. किमान हालचाल ७१. वृद्ध ७२. '--सांगे ज्याला त्याला, वेड लागले राधेला' ७३. धमनी ७४. लोकरूढी, प्रथा ७७. बूड ७८. कोंब, अंकुर ७९. भिंतीवरून सरपटणारा प्राणी ८०. कबूतर ८१. दक्ष, दक्षतेचा इशारा

उभे शब्द १. जादूगाराचे कौशल्य-शर्विलकाच्याही हाती २. शेवट ३. हुबेहूब सोंग वठवणारा ४. घराची अब्रू घालवणारा ५. शंकराचे एक नाव ६. तिबेटी धर्मगुरु ७. पत्ता, शोध ८. तट्ट, फुगलेले ९. लक्ष पण अवधान नाही ११अ. गणेशमंदिरामुळे प्रसिद्ध असलेली पुण्यातील बाग १३. मजल, टप्पा १६. नियमित यात्रा करणारा १८. भरपूर कमाईचे 'जाडजूड; विशेषण १९. दरी २२. बांधकामासाठी कालवलेले मिश्रण २३. फुलांचे दागदागिने २४. टाळ्यांचा आवाज २६. सुकवलेली काळी द्राक्षे २८. रात्रभर ३१. लहान मूल ३२. आदित्यवार ३४. संत ज्ञानेश्वरांनी केलेली प्रार्थना ३५. बंदी, मज्जाव ३७. शिवशाहीचा ध्वज ३९. लिहिलेला लेख, संदेश इ. ४०. बांबूची मोठी टोपली, हारा ४५. एकरुप ४६. काम इ. लांबणे ४८. वारा, वायू, त्रास ४९. कच्चे लिखाण (इंग्रजी) ५०. वेदनेने ओरडणे, हळहळ व्यक्त करणे ५२. हुक्की, लहर ५३. अव्यवस्था, गोंधळ ५५. पाठशिवणीचा खेळ ५६. -- --- म्हणून लांडोरही नाचते (म्हण) ५७. हिंदीत रक्त ५८. चक्र ६०. पशू ६२. पुरुष ६४. राजाचा सैनिकी अधिकारी ६५. कान व डोळा यामधील भाग ६७. प्राचीन, जुने ७०. टक, दृष्टी ७५. कोरा ७६. त्याप्रमाणे

सेवापूर्ती सत्कार समारंभ..!

# पंचायत समिती मधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे गट विकास अधिकारी सचिन खुडे यांच्या हस्ते सत्कार

अक्कलकोट/प्रतिनिधी :अक्कलकोट पंचायत समिती शिक्षण विभागात विस्तार अधिकारीपदी म्हणून कार्यरत असणारे जाफर मुल्ला हे आज प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्यामुळे पंचायत समिती गट विकास अधिकारी सचिन खुडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. याप्रसंगी पंचायत समिती अक्कलकोट येथे प्रशासनाच्यावतीने आयोजित केलेल्या सेवापूर्ती सत्कार समारंभ कार्यालयातील कर्मचारी कार्यक्रमास उपस्थित राहून शुभेच्छा दिले. यावेळी मा.गट विकास अधिकारी सचिन खुडे ,मा.गटशिक्षणाधिकारी कुदसिया शेख, विस्तार अधिकारी बी एस तुळजापुरे, बी सी सलगरे, कोळी, संजय पाटील,कक्ष अधिकारी मेघराज कोरे, सहायक कक्ष अधिकारी दयानंद परिचारक, अभिमन्यू कांबळे, यासह प्रशासकीय विभागातील अधिकारी उपस्थित होते. यावेळी विस्तार अधिकारी मुल्ला यांचा मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.



# काळे गटाला मोठा धक्का विद्यमान संचालक अभिजीत पाटील यांच्या गटात

## सहकार शिरोमणीचे संचालक बाळासाहेब कौलगे आणि संचालक बिभीषण पवार व माजी जेष्ठ संचालक मधुकर गिड्डे यांच्यासह अनेक दिग्गज नेत्यांचे प्रवेश



पंढरपूर/प्रतिनिधी: पंढरपूर तालुक्यातील विठ्ठल परिवारात असलेल्या सहकार शिरोमणी वसंतराव सहकारी साखर कारखान्याची पंचवार्षिक निवडणूक रणधुमाळी चांगली रणधुमाळी सुरू असताना अभिजीत पाटील यांच्याकडे दिग्गज नेत्यांचे वाढते वजन पारड्यात पडल्याने अभिजीत पाटलांचे राजकीय वजनात अजून भर पडली आहे.दि.३०मे रोजी सायं७वा उपरी येथे सहकार शिरोमणी वसंतराव काळे सह.साखर कारखान्याचे विद्यमान संचालक बाळासाहेब कौलगे आणि संचालक बिभीषण पवार त्यांच्यासह सुपली येथील डी.वाय ग्रोचे बाळासाहेब यलमार, माजी संचालक, पोलीस पाटील बाळासाहेब पाटील, सहकार शिरोमणीचे मा.संचालक मधून गिड्डे, मा. बाळासाहेब बापू शेवाळे, शेळवे आर डी पवार सर, पळशी बजरंग जाधव, गोपाळ तात्या झांबरे, कल्याण काळे यांचे कट्टर समर्थक संजय मधुकर गाजरे सर, देवानंद जगदाळे आनंदा जगदाळे, श्रीमंत जाधव, जगन्नाथ लंगोटे, माणिक रामचंद्र गाजरे महाराज यांच्यासह आढीव येथील तंटामुक्ती अध्यक्ष नितीन चव्हाण यांनी अभिजीत पाटील गटामध्ये जाहीर प्रवेश केला.उपरी, सुपली, पळशी, शेळवे या गावातील असंख्य प्रतिष्ठित व्यक्तींनी सहकार वाचविण्यासाठी, त्याला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी, आपल्या सोबत काम करण्याची भूमिका घेत आपल्या पॅनलमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. सत्ताधारी ऊस बिल, कर्मचाऱ्यांचे देणे, पुढील हंगामात पैसे उपलब्ध कसे करणार या साध्या प्रश्नांची उत्तर देऊ शकतील का? असा प्रश्न यावेळी अभिजीत पाटील यांनी उपस्थित केला.यावेळी विठ्ठलचे संचालक साहेबराव नागणे, दत्तनगर नागणे, पेटकर आप्पा नागणे, माणिक नागणे, अशोक जगदाळे, सदाशिव मुळे, ज्ञानेश्वर तात्या नागणे, भगवान नागणे, शहाजी जगदाळे, जयवंत नागणे, भीमराव गव्हाणे, पोपट आसबे, नवनाथ आसबे, बबन मोहिते, चंद्रकांत जाधव, कल्याण नागणे, गोरख नागणे, केशव सुरवसे तसेच प्रवीण नागणे सर भारत नागणे बजरंग नागणे यांसह आदी मान्यवर उपस्थित होते. .

# योगगुरु गुरुदेव दिपकजी शिळीमकर स्वामीरत्न पुरस्काराने सन्मानित



पुणे : समर्थ नगरी प्रतिष्ठान अक्कलकोट संचलित समर्थनगरी अध्यात्मिक राज्यस्तरीय समितीच्या वतीने योगगुरू गुरुदेव दिपक जी शिळीमकर यांना पुणे येथील अण्णाभाऊ साठे सभागृहामध्ये असंख्य स्वामी भक्तांच्या साक्षीने त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना स्वामीरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्वामी समर्थ महाराजांचे प्रथम सेवेकरी, अक्कलकोट वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष माननीय श्री महेशजी इंगळे, चोळाप्पा महाराज यांचे पाचवे वंशज माननीय श्री अनु महाराज यांच्या शुभ हस्ते त्यांना स्वामींची शाल, श्रीफळ सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या सोहळ्यास गोगावच्या सरपंच तथा जिल्हा समन्वयक मुंबई महाराष्ट्र सौ वनीता सुरवसे सहीत राज्यातून अध्यात्मिक क्षेत्रामधील अनेक मान्यवर उपस्थित होते. ब्रह्ममूहुर्त योग ज्ञानपीठ केंद्राचे संस्थापक अध्यक्ष योग गुरुदेव दिपकजी शेळीमकर यांना लहानपणापासूनच अध्यात्मिक वेड , योग आणि शरीरशास्त्र यावर सखोल चिंतन करून स्वतःचे ब्रह्ममुहूर्त योग ज्ञानपीठ केंद्र सुरू करून गोळ्यांपासून मुक्तता , करोना कालावधीमध्ये आमदार निलेश लंके यांच्या कोविड सेंटर मध्ये अनेक लोकांना अध्यात्मिक धडे देऊन आणि योग उपचार करून असंख्य कोविड पेशंट बरे करणारे, अनेक साधकांना, पोलिसांना, कोविड पासून मुक्तता कशी मिळेल यावर योग्य मार्गदर्शन करून करोना च्या कालावधीमध्ये अनेक पोलीस अधिकाऱ्यांच्या मनातील भीती घालून त्यांना फुफ्फुसाची क्षमता वाढवण्यासाठी काय व्यायाम करावे हे प्रॅक्टिकल करून घेणारे,अनेक शाळेतून विद्यार्थ्यांना योगाचे धडे , येरवडा जेलमधील कैद्यांना योग शिबिर घेऊन आनंदी जीवन कसे जगावे याबद्दल मार्गदर्शन, रोज मोफत हजार लोकांना अविरतपणे योगाचे धडे देणारे, मोफत योग शिबिर, वेट लॉस शिबिर, निवासी शिबिर, मुलांसाठी साहशी शिबिर , वारकऱ्यांसाठी सतत अविरतपणे सेवा, दुर्गम भागातील वारकरी विद्यार्थ्यांसाठी अन्नदान करणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व, अशा त्यांच्या सामाजिक कामाचा डोंगर पाहून त्यांना स्वामी रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. सर्व समाजातून परिसरातून त्यांच्या कौतुक होत आहे, योग्य व्यक्तीला स्वामीरत्न पुरस्कार दिल्याबद्दल समाधान व्यक्त होत आहे. त्यांच्या हातून असेच समाजकार्य घडत राहो, स्वामी त्यांना अजून शक्ती देवो हीच स्वामी चरणी प्रार्थना असे अभिनंदन करतेवेळी अक्कलकोट वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष माननीय श्री महेशजी इंगळे आणि सरपंच सौ वनिता सुरवसे म्हणाल्या. लवकरच अक्कलकोट मध्ये योग शिबिर घ्यावे अशी त्यांना दोघांनी विनंती ही केली.



# सेवानिवृत्त पर्यवेक्षक नारायण मोरे यांचा सत्कार

अक्कलकोट/प्रतिनिधी: अक्कलकोट तालुक्यातील गौडगाव बुख येथील श्री जगदगरु पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेचे आदर्श शिक्षक तथा पर्यवेक्षक नारायण मोरे व सहशिक्षक स्वामीराव सुरवसे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. या सेवा निवृत्ती निमित्त नारायण मोरे व स्वामीराव सुरवसे यांचा सत्कार मध्यप्रदेशचे वित्त विभागचे सचिव ज्ञानेश्वर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बाळासाहेब मोरे,अमरभाऊ पाटील लालासाहेब तांबडे आदी उपस्थित होते.



# जनतेच्या मागणीला प्रथम प्राधान्य हाच ध्यास : आ. कैलास पाटील

कळंब/प्रतिनिधी : तालुक्यातील भोगजी उप केंद्रावरील आढाळा फिटरचे काम पूर्ण झाल्याने शेतकऱ्यांच्या उपस्थितीत कळंब- धाराशिव चे आमदार कैलास घाडगे पाटील यांनी लोकार्पण केले. यामुळे आढाळा, गावासह पाथर्डी, पिंपळगाव आणि भोगजी, येथील शेतकरी बांधवांना सुरळीत वीज पुरवठा होणार आहे. यावेळी आ.पाटील म्हणाले की जनतेच्या मागणीला प्रथम प्राधान्य हाच ध्यास अविरतपणे जपायचा आहे. शेतकरी बांधवांची विजेची समस्या दूर होण्याचे समाधान निश्चितच मोठे आहे. या सर्व स्टेशनमुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी कांबळे, जमादार गणेश बापू, चेअरमन बापूसाहेब वायसे, शाखाप्रमुख दशरथ वायसे, सचिन हगारे, उमेश शिंदे, संतोष खराटे, अविनाश खराटे, रोहित अडसूळ, उत्कर्ष अडसूळ,बालाजी अडसूळ, बापूसाहेब पिंगळे, कैलास हगारे, बाबासाहेब कोठावळे, पवन सावंत, आधी सह शेतकरी बांधव उपस्थित होते.

# भिंवडी मनपातील कर्मचारी चंद्रमणी पंडीत सेवानिवृत्त

भिवंडी/मिलिंद जाधव : भिवंडी महापालिकेत सफाई कर्मचारी म्हणून कार्यरत असलेले चंद्रमणी पंडित हे बुधवारी निहित वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. भिवंडी महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या तळमजल्यावर आयोजित कार्यक्रमात पंडित यांचा सन्मान करण्यात आला.चंद्रमणी पंडित यांनी महापालिकेत ३६ वर्ष सेवा केली आहे.त्यांच्या सेवा निवृत्ती कार्यक्रमाप्रसंगी भिवंडी महापालिका मुख्यालय उपायुक्त दीपक झिंजाड, सहाय्यक आयुक्त बाळाराम जाधव, जनसंपर्क अधिकारी सुनील झळके यांच्यासह भिवंडी मनपाचे अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.चंद्रमणी पंडित यांच्या सोबत महापालिकेतील विविध विभागातील वीस कर्मचारी यावेळी सेवानिवृत्त झाले. या सर्व कर्मचाऱ्यांचा सन्मान महापालिकेच्या वतीने करण्यात आला. महापालिका मुख्यालयात आयोजित केलेल्या सेवानिवृत्त कार्यक्रमाप्रसंगी कर्मचारी युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्तीनंतर मिळणारे धनादेश व सेवानिवृत्ती वेतन यात भिवंडी मनपा प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणात कसुर केली जात असून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना वेळेवर त्यांचे धनादेश वेळेवर मिळत नसल्याची खंत कर्मचारी युनियनच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.



# वसंत मुंडे यांना उत्कृष्ट सामाजिक पत्रकारिता पुरस्कार

## दुबईत लोकमतच्या आंतरराष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळ्यात गौरव

मुंबई/प्रतिनिधी : लोकमत मीडिया ग्रुपच्या वतीने आंतरराष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात दुबई येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई चे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांना या वर्षीचा 'एक्सलन्स इन सोशल जर्नलिझम अवार्ड' देऊन सांस्कृतिक कार्यमंत्री मा. सुधीर मुनगंटीवार, लोकमतचे प्रमुख मा. राजेंद्र दर्डा यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्रासह देशभरातील विविध क्षेत्रांतील प्रमुख मान्यवर उपस्थित होते. माध्यमक्षेत्रातून आंतरराष्ट्रीय पुरस्कारासाठी निवडलेले वसंत मुंडे हे पहिले व एकमेव आहेत.




महाराष्ट्रासह देशभरात मराठी वृत्तपत्रातील आघाडीच्या लोकमत मिडिया समूहाचा या वर्षीचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार सोहळा रविवार २८ व २९ मे रोजी दुबईतील हॉटेल ग्रँड हयात येथे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, लोकमतचे प्रमुख राजेंद्र दर्डा, आघाडीचा अभिनेता स्वप्निल जोशी, अभिनेत्री नुसरत भरूचा, दुबई स्पोर्ट सिटी चे अब्दुल रहमान फलकनाथ, मसाला किंग अल हिदा ग्रुपचे धनंजय दातार यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व पुरस्कारप्राप्त मान्यवर उपस्थित होते.

या वेळी मराठी पत्रकारीतेत वीस वर्षांपासून कार्यरत आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या माध्यमातून पत्रकारांचे मजबूत संघटन उभे करून वृत्तपत्रांचे अर्थकारण व पत्रकारांच्या समस्या याविषयी सकारात्मक बदल करणारे, तसेच डिजिटल मिडियात, भारतातील पहिला नवीन प्रयोग करणारे व पत्रकारितेच्या माध्यमातून रचनात्मक काम उभे करणारे वसंत मुंडे यांच्या कामाची दखल घेऊन या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. लोकमतचा माध्यम क्षेत्रातील पुरस्कार मिळालेले वसंत मुंडे पहिले ठरले आहेत.

प्रतिकूल परिस्थितीला हरवणाऱ्या शेतकऱ्यांच्या यशोगाथा, प्रशासकीय पातळीवर बदल घडवणार्या विषयांवर त्यांनी विपुल लिखाण केले आहे. तर कोरोनात पत्रकार संघाच्या माध्यमातून सोळाशे पिशवी रक्त संकलन, ताळेबंद अडकलेल्या आणि अडचणीत सापडलेल्या पत्रकारांना विविध माध्यमातून मदत. तर आर्थिक अडचणीत सापडलेल्या वृत्तपत्रांनी पारंपरिक आर्थिक धोरण बदलून उत्पादन खर्चावर आधारित विक्री किंमत वाढवली पाहिजे यासाठी वृत्तपत्रांच्या अर्थकारण आणि पत्रकारांच्या समस्या या विषयावर राज्यभरात सात अधिवेशने घेऊन जनजागृती केली. यातून चारशे वृत्तपत्रांनी किमती वाढवण्याचा निर्णय घेतला. सामान्य माणसाचा लोकशाहीतील आवाज असलेली वृत्तपत्रे व पत्रकारांच्या समस्या मांडण्यासाठी वसंत मुंडे यांनी कणखर भूमिका घेतली. याची दखल घेऊन या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# जागतिक तंबाखू विरोधी दिन, प्रांत कार्यालयात तंबाखू विरोधी शपथ

पंढरपूर/प्रतिनिधी: जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त प्रांत कार्यालय, पंढरपूर येथे उपस्थित अधिकाऱ्यांना सामुहिकपणे तंबाखु विरोधी शपथ देण्यात आली. राज्यात सदर व्यसनाचे प्रमाणकमी करण्यासाठी सर्वांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे.

या अनुषंगाने प्रांत कार्यालय, पंढरपूर येथे उपस्थित सर्व तालुका विभाग प्रमुख तसेच अधिकारी कर्मचाऱ्यांना तंबाखु विरोधी शपथ देण्यात आली.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जून भोसले, तहसिलदार सुशिल बेल्हेकर, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, मुख्याधिकारी अरविंद माळी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले, महावितरणचे कार्यकारी अभियंता बी.ए.भोळे तसेच संबधित विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते. तंबाखु विरोधी शपथ उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी तंबाखु विरोधी शपथ डॉ. प्रसन्न भातलवंडे यांनी वाचन करुन उपस्थित अधिकाऱ्यांना दिली. तसेच जिल्हा स्तरावर तंबाखू नियंत्रण कक्षामार्फ़त तयार करण्यात आलेली, लिंक, क्यु आर कोड यावेळी सर्वांना देण्यात आला.



# नैसर्गिक आपत्ती नियोजनाचा कृती आराखडा प्रत्येक विभागाने तयार करावा : प्रांताधिकारी गजानन गुरव

पंढरपूर/प्रतिनिधी: पावसाळ्यात अचानक उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी प्रत्येक विभागाने नियोजनाचा कृती आराखडा तयार करावा. तसेच मान्सून कालावधीतील संभाव्य आपत्ती लक्षात घेता सर्व विभागांनी समन्वयाने नियोजन करावे अशा सूचना प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी दिल्या. पंढरपूर तालुक्यातील मान्सून कालावधीमध्ये संभाव्य आपत्तीचे व्यवस्थापन करण्यासाठी प्रांत कार्यालय पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जून भोसले, तहसिलदार सुशिल बेल्हेकर, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, मुख्याधिकारी अरविंद माळी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले, महावितरणचे कार्यकारी अभियंता बी.ए.भोळे तसेच संबधित विभागाचे विभागप्रमुख उपस्थित होते. यावेळी प्रांताधिकारी श्री.गुरव म्हणाले, मान्सूनपूर्व कालावधीत सर्व विभागांनी नैसर्गिक आपत्तीचे नियोजन करणे गरजेचे आहे. पंढरपूर तालुक्यातील ४७ गावे नदी काठी असून, नदी काठावरील गावे पूरपरिस्थितीने बाधित होतात व पुराच्या पाण्यामुळे काही गावांचा संपर्क तुटतो या गावांमध्ये संभाव्य पूर परिस्थितीमध्ये नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यासाठी पर्यायी जागा उपलब्धतेबाबत नियोजन करावे. आरोग्य विभागाने पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या रोगाबाबत पुरेसा औषधसाठा उपलब्ध करून ठेवावा. महावितरणने वीज पुरवठा खंडित झाल्यास तात्काळ पूर्ववत करावा. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने नागरिकांना पावसाळ्यात स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. पावसामुळे पिकांचे नुकसान झाल्यास तात्काळ संबंधित विभागाच्या अधिकारी कर्मचारी यांनी प्राथमिक पाहणी करून अहवाल तयार करावा. पांटबंधारे विभागाने धरणातून नदीपात्रात सोडण्यात येणाऱ्या पाण्याची व नदीपात्रातील पाणी पातळीची माहिती वेळोवेळी ग्रामपंचायतच्या माध्यमातून संबंधित गावांना कळविण्यात यावी.

तसेच पावसाळ्यात ओलाव्यामुळे जनावरांना रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता लक्षात घेऊन पशुसंवर्धन विभागाने लसीकरण करून घ्यावे. शिक्षण विभागाने शाळा सुरू होण्यापूर्वी शाळांची आवश्यक ती दुरुस्ती करून घ्यावी. तसेच सर्व विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी मुख्यालयाच्याच ठिकाणी उपस्थित राहावे. अशा सूचनाही प्रांताधिकारी गुरव यांनी यावेळी केल्या.